रू.--------------/- (खरेदी रकमेच्या १० टक्के) अक्षरी रक्कम रूपये -- -------------------- मात्र दुस-या मजल्याचा स्लॅब पुर्ण झाल्यावर.

रू.--------------/- (खरेदी रकमेच्या १० टक्के) अक्षरी रक्कम रूपये -- -------------------- मात्र तिस-या मजल्याचा स्लॅब पुर्ण झाल्यावर.

रू.--------------/- (खरेदी रकमेच्या १० टक्के) अक्षरी रक्कम रूपये -- -------------------- मात्र चौथ्या मजल्याचा स्लॅब पुर्ण झाल्यावर.

रू.--------------/- (खरेदी रकमेच्या १५ टक्के) अक्षरी रक्कम रूपये -- -------------------- मात्र तुमच्या मजल्याचे प्लॅस्टरचे काम पुर्ण झाल्यावर.

रू.--------------/- (खरेदी रकमेच्या १५ टक्के) अक्षरी रक्कम रूपये -- -------------------- मात्र तुमच्या मजल्याचे फिनीशींगचे काम पुर्ण झाल्यावर.

रू.--------------/- (खरेदी रकमेच्या १० टक्के) अक्षरी रक्कम रूपये -- -------------------- मात्र खरेदीखत नोंदणी करते वेळी.

रू.--------------/- एकुण अक्षरी रक्कम रूपये --------------------- - मात्र

वरील सौद्यापोटी तुम्ही माझ्या नावाचा शाखा चा चेक नं. दिनांक / / रोजीचा दिला तो मिळाला ती रक्कम मी खरेदीखताच्या वेळी मजरा करून देईल.त्या शर्ती

१) सदर मिळकतीचे खरेदीखत मी तुम्हास आज पासुन ------- महिन्याच्या आंत तुम्ही सांगाल त्या एक अगर अनेक नावाने तुमच्या खर्चाने निर्वेध निर्जोखीम खरेदी करून देईल.वरील मुदतीत तुम्ही सदर फ्लॅट घर जागेची राहीलेली रक्कम देवून खरेदीखत लिहुन व नोंदवून घ्यावयाचे आहे व राहील.

२) सदर फ्लॅट घर जागेचा सौदापावतीचा खर्च म्हणजे स्टॅम्प लिखाई नोंदणी फी वगैरे सर्व खर्च हा लिहुन घेणार यांनी केलेला असुन खरेदीखतासाठी लागणारा खर्च तुम्ही लिहुन घेणार यांनी करावयचा आहे व राहील.

३) सदर फ्लॅट घर जागा मी यापुर्वी कोठेही गहाण खरेदी बक्षीस सौद्यात वगैरे बोज्यात दिलेली नाही.तसे काही निघाल्यास त्याचे निवारण मी माझे खर्चाने दुर करून देईल. तुम्हास खर्चाची कोणतीही तोशिष लागु देणार नाही.

४) सदरची मिळकत ही फ्लॅट सिस्टीमची असल्याने भविष्यात जळगांव महानगरपालिका जळगांव यांचेकडुन गच्चीवरील वा बाजुचा एफ.एस. आय.किंवा टि.डी.आर.वाढवून मिळाल्यास तसेच प्लाट जागेचे क्षेत्रफळ वाढवून मिळाल्यास त्यावर बांधकाम करण्याचा संपुर्ण मालकी हक्क माझा म्हणजे लिहुन देणार यांचा आहे व राहील.त्यास तुम्हास कोणताही अडथळा अगर आडकाठी दाखविता येणार नाही.

Scanned by CamScanner

५) सदरची फ्लॅट घर जागा मी तुम्हास खरेदीखता वेळेस प्रत्यक्ष ताब्यात देईल.

६) सदर फ्लॅट घर जागेचा उपयोग तुम्ही इतर फ्लॅट धारकांना त्रास होणार नाही अशा रितीने रहीवासासाठीच करावयाचा आहे. तसेच सदर फ्लॅट सिस्टीमचे इमारतीस धोका निर्माण होईल असे कोणतेही कृत्य तुम्हास करता येणार नाही.

७) तुम्हास खरेदी देत असलेल्या मजल्यावरील फ्लॅट नं. याचा संपुर्ण इमारतीतील सामाईक सुखसोईमध्ये टक्के इतका अविभाज्य हिस्सा आहे. तो तुम्हास कधीही विभागुन मागता येणार नाही.

८) सदर वर वर्णन केलेल्या स्थावर मिळकती बाबतचे आज खरेदीखतापावेतोचे संपुर्ण बिनशेती कर, महानगरपालीका कर, घरपट्टी कर, पाणपट्टी, इले. बिल तसेच इतर सर्व सरकारी व निमसरकारी कर मी लिहुन देणार यांनी भरावयाचे असून खरेदीखतानंतर येणारे सर्व कर तुम्ही भरावयाचे आहे व राहतील. सरकार कडुन आकारला जि एस टी अथवा कुठलाही कर हा व्यवहारात ग्राह्य धरलेला नसुन ते भरण्याची संपुर्ण जबाबदारी तुम्ही लिहुन घेणार फ्लॅट धारक यांची राहील.

९) सदर प्लॉट जागेवरील बांधीव फ्लॅट सिस्टीम इमारतीस "कल्पतरू" असे नांव दिलेले असुन सदरचे इमारतीबाबतचे घोषणापत्र डिड ऑफ डिक्लेरेशन ता. / / रोजी दस्त नं. अन्वये दु.नि. जळगांव १ यांचे कार्यालयात महाराष्ट्र वेश्म मालकी अधिनियम व महाराष्ट्र वेश्म मालकी नियम यांचे तरतुदी नुसार सब रजिस्ट्रार जळगांव यांचे कार्यालयात नोंदविलेले आहे. सदरचे घोषणापत्र तुम्ही वाचलेले आहे व वाचुन त्यांस मान्यता दिलेली आहे. सदर घोषणापत्रातील नियम अटी व शर्ती यापुढे तुमच्यावर मालक म्हणुन बंधनकारक आहेत व राहतील.

१०) सदर फ्लॅट घरजागेसाठी असलेल्या सामाईक सुखसोई सर्व फ्लॅट धारकांच्या वापरासाठी असल्याने त्या सुस्थितीत ठेवण्याची संपुर्ण जबाबदारी सर्व फ्लॅट धारकांची आहे व राहील.

११) सदर फ्लॅट सिस्टीम इमारतीसाठी असलेल्या सामाईक सुखसोई जसे लिफ्ट, सेप्टींग टॅक, बोअरींग, इले. मोटार, सामाईक जागेतील लाईटस् वगैरे साठी वेळोवेळी लागणारा संपुर्ण खर्च हा सदर इमारतीमधील सर्व फ्लॅट धारकांनी ठरविल्यानुसार सर्व सभासदांनी जमा करून संपुर्ण खर्च करावयाचा आहे व राहील.

१२) सदर "वृंदावन" या फ्लॅट सिस्टीम इमारतीसाठी एक लिफ्ट ईन्व्हर्टर बॅटरी बॅकअपसह दिलेली असुन सदर लिफ्ट इमारतीतील फक्त फ्लॅट धारकांच्या सामाईकात वापरासाठी दिलेली आहे व राहील. सदर लिफ्टचा भविष्यातील दुरूस्ती मेंटेनन्स चा खर्च सर्व फ्लॅट धारकांनी सामाईकात करावयाचा आहे व राहील. तसेच सदर लिफ्टचा अपघात वगैरे झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी सर्व फ्लॅट धारकांवर आहे व राहील.

Scanned by CamScanner

१३) रेरा कायद्यातील अटी व शर्ती तुम्ही लिहुन घेणार व मी लिहुन देणार यांच्यावर बंधनकारक आहेत व राहतील.

१४) सदर फ्लॅट घर जागेची किंमत रूपये ------------/- मात्र असुन त्यावर मुद्रांक शुल्क रूपये रूपये ------------/- मात्रचा लावून व नोंदणी फी रूपये ------------/- मात्र भरून सदर मिळकतीचे खरेदीखत लिहुन व नोंदवून देत आहे.

१५) सदरचे खरेदीखत आम्ही लिहुन देणार व आमचे वंशवाली वारस व तुम्ही लिहुन घेणार व तुमचे वंशवाली वारस यांचेवर बंधनकारक आहे व राहील.

वरील प्रमाणे बयाणा रक्कम रूपये ------------/- अक्षरी रक्कम रूपये ----------------- मात्र चेकद्वारे मिळाले. सदरचा सौदापावती करारनामा आपण दोघांनी वाचुन समजुन उमजुन राजीखुशीने व दोघांच्या सांगण्यावरून खालील साक्षीदारांसमक्ष सही करून लिहुन दिली असे.

लिहुन देणार सही.

-------------------------

श्री. सागर पंडीत ताडे

लिहुन घेणार सही.

-------------------------

श्री. -------------------------

| साक्षीदार | सही. |
|---|---|
| १) नाव ------------------------- | ------------------------- |
| पत्ता ------------------------- | |
| २) नाव ------------------------- | ------------------------- |
| पत्ता ------------------------- | |

Scanned by CamScanner